नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २४/०५/२०२६ (रविवार)**

---

# नागपुर परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा (FSL) विषयक कार्यशाळा संपन्न

दिनांक २३/०५/२०२६ रोजी पोलीस भवन, येथे ऑडिटोरियम हॉल, नागपूर येथे न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा (FSL) विषयक विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा नागपुर परिक्षेत्रातील नागपुर ग्रामीण, चंद्रपुर, भंडारा आणि वर्धा या जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

**सदर कार्यशाळेचा उद्देश पोलीस अधिकारी व अंमलदारांना तपास प्रक्रियेमध्ये वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञान प्रदान करून तपास कार्य अधिक प्रभावी करणे हा होता. कार्यशाळेमध्ये गुन्हे तपासातील जैविक पुरावे, भौतिक पुरावे यांची योग्य जप्ती, सिलींग, लेबिलिंग बाबत सविस्तर माहीती देण्यात आली. तसेच डिजिटल व सायबर तपास, संगणक गुन्हे अन्वेषण तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेत डॉ. विजय ज. ठाकरे, संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. अश्विन दि. गेडाम, उपसंचालक, प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, नागपूर तसेच श्री. निलेश पाटील, सहायक संचालक (संगणक गुन्हे), न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, गृह विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी उपस्थित अधिकारी व अंमलदारांना मार्गदर्शन केले.**

सदर कार्यशाळेस मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण हे उपस्थित होते. तसेच नागपूर परिक्षेत्रातील नागपूर ग्रामीण, वर्धा, भंडारा व चंद्रपूर जिल्हयातील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच प्रत्येक घटकातील उपविभाग स्तरावर असलेले FSL व्हॅन चे कर्मचारी सुध्दा सहभागी झाले होते. कार्यशाळेमुळे तपास प्रक्रियेमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व तांत्रिक कौशल्य वृद्धिंगत होण्यास निश्चितच मदत होणार आहे.


Dr.Vijay J. Thakare,
Director,
Directorate of Forensic Science
Laboratories, Home Department, State
of Maharashtra., Mumbai
CRIME SCENE DO NOT CROSS


Organizational Set up



# मा. जिल्हा व सत्र न्यायालय,नागपुर यांनी ४ आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला

**मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपुर** यांनी ४ आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर आरोपी हे कोर्टात हजर येत नसल्याने त्यांना हजर होण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे. अन्यथा त्यांचे वर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

आरोपी नामे **गुलाब अहमद कालीया, वय १८ वर्षे, रा. गजानन नगर, नागपुर, २) इजायर खान उर्फ राजु ,वय १९ वर्षे, रा गजानन नगर, नागपुर, ३) मोहम्मद अहमद अब्दुल खालीद, वय १९ वर्षे, रा गजानन नगर,नागपुर आणि ४) संजीव सिताराम यादव, वय १९ वर्षे,रा. राजु नगर, नागपुर** यांचे वर सन २००६ मध्ये पोलीस स्टेशन उमरेड येथे अप. क्र. ३६/२००६ कलम ३७९, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयाचा स्पेशल केस क्र. MSEB /100047/2011 अन्वये खटला मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपुर येथे सुरू असुन सदर आरोपी हे सुनावणीदरम्यान मा. न्यायालयात हजर होत नसल्याने **मा. जिल्हा व सत्र न्यायालय, नागपुर** यांनी सदर आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर आरोपी ला कोर्टात ०३/०६/२०२६ रोजी हजर होण्याबाबत आदेशित केले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ७८ हजार ७५० रूपयाचा मुद्देमाल जप्त, पोलीस स्टेशन काटोल यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २३/०५/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ फल्ली मार्केट मधील एचडीएफसी बॅंक समोर काटोल येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान होंडा मोपेड ॲक्टीव्हा गाडी क्र. एम एच ४०/सि जी १९४२ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता एका कापडी थैलीमध्ये वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारू मिळुन आल्या. **आरोपी नामे सुधाकर शामराव डवरे, वय ६१ वर्ष, रा. गळपुरा चौक, काटोल जि. नागपुर हा अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) वेगवेगळया कंपनीच्या विदेशी दारू आणि होंडा मोपेड ॲक्टीव्हा गाडी क्र. एम एच ४०/सि जी १९४२ किंमती ७५,०००/—रू असा एकुण किंमती ७८,७५०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपी सुधाकर शामराव डवरे, वय ६१ वर्ष, रा. गळपुरा चौक, काटोल जि. नागपुर याचेविरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०५ गुन्हे नोंद. एकुण २१३८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक २३/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २१३८/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे रामदास सोनबाजी वाडबुद, रा. वार्ड नं. ९, मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) अविनाश सुभाष डुंभरे, वय ३५ वर्ष, रा. प्रभाग क्र. ०५, नवीन वस्ती, ता. जि. नागपूर २) राजेश अशोक भुमरकर, वय ३८ वर्ष, रा. वार्ड नं. ०६, हनुमान नगर बोरी, ता. जि. नागपूर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे मुकुंदा सोमाजी बालपांडे, वय ५४ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी नामे नाना मानिकराव शेगावकर, वय ६० वर्ष, रा. कलारओळी चौक, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद,

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक २३/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, विदेशी दारू, दुचाकी वाहन असा एकुण ८२,३१०/– रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे मोहनसिंग मुन्नालाल चौरीया, वय ३३ वर्ष, रा. रिधोरा सातगाव याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे सतिश पांडुरंग सातपुते, वय ३५ वर्ष, रा. मेंढला, ता. नरखेड याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) सरकीला बाबुलाल देशमुख, वय ६३ वर्ष, रा. चोरखैरी, तह. नरखेड २) विठोबा सदबाजी रेवतकर, वय ५० वर्ष, रा. वार्ड क्र. १०, नरखेड याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी सुधाकर शामराव डवरे, वय ६१ वर्ष, रा. गळपुरा चौक, काटोल जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी आशिष आनंद लांजेवार, वय २८ वर्ष, रा. भोलाहुडकी मांढळ, ता. कुही, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी संजोग दिनबा माहिनकर, वय ४५ वर्ष, रा. कावरापेठ उमरेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी योगेश बाबाराव फुले, वय ३४ वर्ष, रा. सिंगारखेडा, तह नरखेड, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी शैलेश धनराज बोरकर, वय २९ वर्ष, रा. वाकी, ता. सावनेर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १) ३० लिटर मोहाफुल गावठी दारू २) १२६० मिली देशी दारू, ३६९० मिली विदेशी दारू, एक दुचाकी वाहन असा एकुण ८२,३१०/– रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने